Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 06 December 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०६ डिसेंबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना ६८ व्या महापरिनिर्वाण दिनी देशभरातून अभिवादन
- ईशान्य भारतातली आठ राज्यं म्हणजे अष्टलक्ष्मीची प्रतीकं असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
- विधानसभेच्या हंगामी अध्यक्षपदी भाजप आमदार कालिदास कोळंबकर यांची नियुक्ती

आणि

- बॉर्डर-गावसकर चषक कसोटी क्रिकेट मालिकेत दुसऱ्या सामन्याच्या पहिल्या डावात भारताच्या १८० धावा

****

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त देशभरात त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ओडिशात भुवनेश्वर इथं बाबासाहेबांना आदरांजली वाहिली. उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी संसद भवन परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केलं.

मुंबईत दादरच्या चैत्यभूमीवर बाबासाहेबांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी आज राज्यभरातून मोठ्या संख्येनं अनुयायी दाखल झाले आहेत.

राज्यपाल सी पी राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी चैत्यभूमी इथं बाबासाहेबांना अभिवादन केलं. यानंतर झालेल्या कार्यक्रमात बोलताना, डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या संविधानामुळे आपला देश उत्तरोत्तर प्रगती करत असल्याचं राज्यपालांनी नमूद केलं.

****

नागपुरात दीक्षाभूमी इथं देखील बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी अनुयायांनी गर्दी केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई यांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं. यावेळी बुद्ध वंदना घेण्यात आली.

****

छत्रपती संभाजीनगर इथं डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात 'आंबेडकरांचे तीन वेगळे पैलू : जल, जमीन आणि जाती ऐक्य' या विषयावर प्रसिद्ध लेखक शाहू पाटोळे यांचं व्याख्यान झालं. जल, जमीन आणि जातीय ऐक्य हे विषय बाबासाहेबांच्या जगण्यातील श्वास आणि ध्यासही होते, असं मत पाटोळे यांनी व्यक्त केलं.

दरम्यान, विद्यापीठाच्या प्रवेशद्वारासमोर असलेल्या बाबासाहेबांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी सकाळपासूनच मोठी गर्दी झाली होती. शहरात विविध उपक्रमातून बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आलं. फेस ऑफ आंबेडकर राईट मूव्हमेंट अर्थात फॅम या सामाजिक संस्थेच्या वतीने 'एक वही एक पेन' हे अभियान राबवण्यात आलं. मिलिंद नागसेन वन स्टुडंट्स वेल्फेअर असोसिएशन आणि रिपब्लिकन विद्यार्थी सेना यांच्या संयुक्त विद्यमानाने रक्तदान शिबिर घेण्यात आलं.

आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर केंद्रात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केलं.

****

जालना शहरासह जिल्ह्यातल्या शाळा, महाविद्यालये, शासकीय, निमशासकीय कार्यालये, पक्ष संघटनांच्यावतीने बाबासाहेबांना अभिवादन करण्यात आलं. शहरातल्या मस्तगड इथल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवाद करण्यासाठी आंबेडकर अनुयायांनी सकाळपासूनच गर्दी केली. भाजपा जिल्हा कार्यालयातही डॉ.आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं.

****

परभणी इथं जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर उपस्थित भिक्खू संघाच्या वतीने पंचशील ध्वजारोहण करून महावंदना घेण्यात आली, त्यानंतर बाबासाहेबांना अभिवादन करण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली.

****

हिंगोली जिल्ह्यात विविध ठिकाणी सभा आणि इतर कार्यक्रमातून बाबासाहेबांना आदरांजली अर्पण करण्यात आली. हिंगोली इथल्या डॉक्टर आंबेडकर पुतळा परिसरात अनुयायांची मोठी गर्दी झाली असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

धाराशिव इथं राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सामाजिक समरसता मंचाच्या वतीने बाबासाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्याला अभिवादन करण्यात आलं, तसंच यानिमित्ताने रक्तदान शिबिर घेण्यात आलं.

विभागात बीड, लातूर, नांदेडसह राज्यात बुलडाणा, वाशिम, धुळे इथंही बाबासाहेबांना विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून आदरांजली वाहण्यात आली.

****

ईशान्य भारतातली आठ राज्यं म्हणजे अष्टलक्ष्मीची प्रतीकं असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. आज नवी दिल्लीत अष्टलक्ष्मी महोत्सवाचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. आपल्या भाषणात पंतप्रधान म्हणाले –

> ***मां लक्ष्मी को सूख, आरोग्य और समृद्धी की देवी कहा जाता है। जब भी लक्ष्मी जी की पूजा होती है, तो हम उनके आठ रूपों को पुजते है। किसी तरह भारत के पूर्वोत्तर में आठ राज्यों की अष्टलक्ष्मी विराजमान है। आज का भारत दुनिया को हेल्दी लाईफस्टाईल से जुडे हुये, न्युट्रीशन से जुडे हुये जो सोल्युशन देना चाहता है, उसमें नॉर्थ ईस्ट की बडी भूमिका है।***

तीन दिवस चालणाऱ्या या महोत्सवात ईशान्येकडील आठही राज्यांची संस्कृती, वस्त्रोद्योग, हस्तकला, पर्यटन स्थळे आणि अद्वितीय उत्पादनं दाखवण्यात येणार आहेत.

****

रिझर्व्ह बँकेनं रेपो दर सहा पूर्णांक पाच टक्के इतका कायम ठेवला आहे. बँकेच्या पतधोरण समितीच्या बैठकीनंतर गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी आज ही माहिती दिली. देशाचा आर्थिक विकास दर सहा पूर्णांक सहा टक्के तर महागाई दर चार पूर्णांक आठ टक्के राहण्याचा अंदाज आहे. २०२५ मध्ये महागाई दर पहिल्या तिमाहीत चार पूर्णांक सहा, तर दुसऱ्या तिमाहीत चार टक्क्यांवर राहण्याची शक्यताही दास यांनी व्यक्त केली आहे.

****

भारतीय जनता पक्षाचे आमदार कालिदास कोळंबकर यांनी आज विधानसभेच्या हंगामी अध्यक्षपदाची शपथ घेतली. राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांनी राजभवनात कोळंबकर यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. उद्यापासून सुरु होणाऱ्या तीन दिवसीय विशेष अधिवेशनात २८८ नवनिर्वाचित विधानसभा सदस्यांना कोळंबकर हे पदाची शपथ देतील.

दरम्यान, राज्यपालांनी उद्या विधानसभेची तर परवा ९ तारखेला विधान परिषदेची बैठक बोलावली असल्याचं विधानमंडळ सचिवालयामार्फत कळवण्यात आलं आहे.

****

विरोधकांच्या गदारोळामुळे लोकसभेचं कामकाज आजही बाधित झालं. आज कामकाज सुरु होताच एका खासगी कंपनीच्या कथित भ्रष्टाचारप्रकरणी काँग्रेससह इतर विरोधी पक्ष सदस्यांनी घोषणाबाजी सुरू केली. अध्यक्ष ओम बिर्ला यांनी प्रश्नोत्तराचा तास सुरु ठेवण्याचा प्रयत्न केला, मात्र गदारोळ वाढत गेल्यानं कामकाज आधी १२ वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी स्थगित झालं.

राज्यसभेत काल कामकाज तहकूब झाल्यानंतर सभागृहाची नियमित तपासणी करताना एका आसनाखाली नोटांची बंडलं आढळून आली. आज सकाळी राज्यसभेचं कामकाज सुरू झाल्यानंतर सभापती जगदीप धनखड यांनी, २२२ क्रमांकाच्या आसनाखाली नोटांची बंडलं आढळून आल्याची माहिती सदस्यांना

दिली. हे आसन काँग्रेसचे खासदार अभिषेक मनु सिंघवी यांचं असून याप्रकरणी तपास सुरू असल्याचंही धनखड यांनी सांगितलं.
दरम्यान, खासदार सिंघवी यांनी आपण सदनात जेव्हा जातो तेव्हा पाचशे रुपयाची फक्त एकच नोट जवळ बाळगतो, असं सांगितलं. काल दुपारी १२ वाजून ५७ मिनिटांनी आपण सदनात गेलो आणि एक वाजता बाहेर पडल्याचं त्यांनी सांगितलं. खासदार अयोध्या रामी रेड्डी यांच्याबरोबर दीड वाजेपर्यंत संसदेतल्या उपाहारगृहात होतो आणि त्यानंतर बाहेर पडल्याची माहिती सिंघवी यांनी दिली.

****

ऑस्ट्रेलियात सुरू असलेल्या बॉर्डर-गावसकर चषक कसोटी क्रिकेट मालिकेतला दुसरा सामना आजपासून सुरू झाला. भारतीय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला. मात्र, यजमान संघाच्या गोलंदाजीपुढे भारतीय फलंदाज टिकाव धरून राहू शकले नाहीत, सलामीवीर यशस्वी जयस्वाल शून्यावर बाद झाला, रोहित शर्मा तीन तर विराट कोहली सात धावांवर तंबूत परतले. पहिल्या डावात भारतीय संघ अवघी १८० इतकीच धावसंख्या उभारू शकला. आजचा खेळ थांबला तेव्हा ऑस्ट्रेलिया संघाच्या एक बाद ८६ धावा झाल्या होत्या.

****

लातूर जिल्ह्यात बाभळगाव पोलीस मुख्यालय मैदानावर आयोजित दिव्यांग विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धांचं उद्घाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्या हस्ते आज झालं. जिल्ह्यातील ५१ शाळांमधील जवळपास ६०० दिव्यांग विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी झाले आहेत. दिव्यांगत्व प्रकार आणि वयोगटानुसार ९२ विविध गटात या स्पर्धा होणार असल्याचं, जिल्हा समाज कल्याण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी यांनी सांगितलं. स्पर्धांच्या उद्घाटनापूर्वी विद्यार्थ्यांनी पथसंचलन केलं, त्यानंतर क्रीडाज्योत प्रज्वलित करण्यात आली. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करुन संविधानाच्या उद्देशिकेचे सामुहिक वाचन यावेळी करण्यात आलं.

****

बीड युवा महोत्सवाचा आज समारोप झाला. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या उपस्थितीत झालेल्या समारोप समारंभात, विविध स्पर्धांमधल्या विजयी स्पर्धकांना पारितोषिकं प्रदान करण्यात आली. युवकांना अशा महोत्सवातून

प्रोत्साहन मिळतं, यातूनच देशाचे भविष्य घडण्यासही मदत होते, असं मत स्वामी यांनी व्यक्त केलं.

****

मराठवाड्यात आज सर्वत्र पावसाने हजेरी लावली. छत्रपती संभाजीनगर शहर आणि परिसरात आज पहाटेपासून सकाळपर्यंत पावसाच्या जोरदार सरी बरसल्या. जालना शहरासह जिल्ह्यात पहाटेपासून ढगाळ वातावरण असून, मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू आहे. या पावसामुळे वेचणीस आलेल्या कापसासह द्राक्ष बागांना या पावसाचा फटका बसण्याची शक्यता आहे.

लातूर जिल्ह्यातही अनेक ठिकाणी पाऊस झाला. लातूर शहरात या पावसामुळे अनेक भागात पाणी साचलं होतं. अचानक आलेल्या पावसामुळे काही ठिकाणी रब्बी हंगामातल्या शेती पिकांचं नुकसान झाल्याचंही वृत्त आहे.

वाशिम जिल्ह्यातील मंगरूळपीर, मानोरा आणि कारंजा या तीन तालुक्यांमध्ये जोरदार पाऊस झाला. या पावसात मंगरूळपीर कृषी उत्पन्न बाजार समितीत आलेलं सोयाबीन भिजल्याचं वृत्त आहे

****

सिंधुदुर्ग जिल्ह्यात आठ पट्टेरी वाघांची नोंद झाली आहे. सावंतवाडी आणि दोडामार्ग तालुक्यात वाघांनी गुरांवर हल्ले केल्याची नोंद झाल्यामुळे वनविभागानं केलेल्या पाहणीत आठ वाघांची नोंद झाली.

****